महाराष्ट्र शासन
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी
मजला, सयानी रोड, प्रभादेवी,मुंबई - ४०० ०२५.
Email- pldeshpande111@gmail.com
दूरध्वनी - ८१६९८८२८९८ /०२२-२४३६ ५९९०

जा.क्र. : पुलदे/आस्था/२०२५/ ६०३
दिनांक : १०/६/२०२५

वाचा: विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत १५० दिवस उपक्रमांतर्गत विकसित महाराष्ट्र व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.

# परिपत्रक

विषय: विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत विकसित महाराष्ट्र व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी नागरिकांकडून सूचना मागविणे बाबत.

विकसित महाराष्ट्र २०४७ या उपक्रमांतर्गत विजन डॉक्युमेंट तयार करण्याबाबत राज्य शासनाचे निर्देश आहेत..त्यात खालील प्रमाणे तीन भाग आहेत:-

१. Long term Vision of १५ August २०४७ (Bharat @ १००)

२. Medium term Vision of ९ May २०३५ (Maharashtra @ ७५)

३. Short term Vision of २ October २०२९ (With Annual Targets)

वरीलप्रमाणे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार या कार्यालयात समिती स्थापन करण्यात आलेली आहे. माहे मे २०२५ पासून ते ०२ ऑक्टोबर २०२५ पर्यंत या १५० दिवसांत पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई या कार्यालयात विकसित महाराष्ट्र २०४७ विजन डॉक्युमेंट अनुषंगाने कार्यवाही करावयाची आहे.

उपरोक्तप्रमाणे विकसित महाराष्ट्र २०४७ विजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या कार्यक्षेत्राशी अपेक्षित टप्पे, कार्यसुलभता, तसेच अकादमीची बलस्थाने आणि योजना, नवीन उपक्रम, नवीन संधी, AI आणि इतर अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आंतरराष्ट्रीय स्तरावर अकादमीच्या माध्यमातून अपेक्षित बदल विचारात घेऊन त्या अनुषंगाने आवश्यक त्या अपेक्षित सुधारणांच्या अंमलबजावणीसाठी संबंधित नागरिकांकडून नाविन्यपूर्ण सूचना, अभिप्राय या परिपत्रकाद्वारे मागविण्यात येत आहेत.

सदर सूचनांवर समितीतील तज्ञांची चर्चा होऊन अंतिम अहवाल तयार करून तो शासनास सादर करण्यात येणार आहे.पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीशी संबंधित अभिप्राय, सूचना नागरिकांनी "नागरिकांचा अभिप्राय - व्हिजन २०४७" या विषयासहित pldeshpande१११@gmail.com या ईमेलवर दि. १५ जून २०२५ पर्यंत पाठविण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

MJoglekar

(मीनल जोगळेकर)
संचालक
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner